divyamarathi.com

ुनिकतेचा कळस • अनेक वर्षांनी रूळवरील स्लिपर बदलण्याचे काम घेतले हार्त

ळे पॅसेंजरचा वेग ताशी ११० कि.मी.
णार; विद्युतीकरणाचे काम वेगात

निधी | चाळीसगाव

ाव ते धुळे रेल्वे मार्गाचे रण तसेच तसेच ील स्लिपर बदलण्याचे तीपथावर आहे. या दोघा चाळीसगाव-धुळे रेल्वे धिक सुखकारक होऊन वेग वाढेल. त्यामुळे वेळ १५ मिनिटांनी कमी ाडीचा वेग सध्या ताशी ९० र असून दोघे कामे पार र गाडीचा वेग ताशी ११० र होईल. ही दोघे कामे रू असल्याने पुढचे १६ ाळीसाव-धुळे पसेंजरची रद्द करण्यात आली आहे.

सरकारच्या खाली असलेल्या रेल्वे ने देशभरात दुरूस्तीची ती घेतली आहे. त्यातून आधुनिकीकरण करण्यात . याच कारणाने मध्यंतरी ल्वे गाड्या रद्द करण्यात ोत्या. आता सिंघल रेल्वे विविध कामे सुरू झाली स्लिपर बदलल्यामुळे धुळे ीचा वेग वाढणार असून ा वेळीची बचत होईल. विद्युतीकरणामुळे रोजचे र लिटर डिझेल वाचणार ब्रिटीषकालीन असलेली ाव रेल्वे स्थानकातून धुळे पॅसेंजर ही महत्वाची हे. एकुण ५६ किलोमिटर ब्रॉडगेज रेल्वे मार्ग आहे. ेच्या भुसावळ विभागाच्या ेणाऱ्या या एकेरी मार्गावर थांबे असून चाळीसगाव ते र गाठण्यास अवघा सव्वा वेळ लागतो. दिवसभरात या रेल्वेने रोजचे दोन ते तीन हजार प्रवासी प्रवास करतात.

या मार्गावरील रूळाखालील स्लिपर बदलण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. काही दिवसांपुर्वी याच कामासाठी तीन महिने धुळे पॅसेंजरची दुपारची एक फेरी बंद केली होती. त्याकाळात वेगाने धुळे ते जामदा दरम्यानचे रूळाखालील स्लिपर बदलण्याचे काम पूर्ण केले. आता जामदा ते चाळीसगाव या दरम्यानचे काम हाती घेण्यात आले आहे. दरम्यान या मार्गावरील रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरणाची नितांज गरज आहे. प्लॅटफार्मची लांबी वाढवून शेडही करावे, अशी मागणी आहे. धुळे मार्गावरील सर्व स्टेशनवर साफसफाई मोहीम हाती घेण्यात आली होती. याशिवाय या सर्व स्टेशनवर स्टाईल बसविण्याचे काम आवश्यक तेथे पूर्ण करण्यात आले आहे. या मार्गावर रोजचे ४०० प्रवासी अपडाऊन करणारे आहेत. तर धुळे तसेच शिरूडसाठी उतरणारे सर्वात जास्त प्रव या मार्गावर असतात. गोंदी कोल्हापुर महाराष्ट्र एक्सप्रेस त दादर-अमृतसर एक्सप्रेस या गाड्यांना धुळ्याचे चार डबे चाळीसगावातून जोडले जात त्यामुळे रेल्वेने पुणे येथे जाण्यास धुळेकरांची सोय झाली आहे.

प्रवाशांची होणार सोय : विद्युतीकरणाने रोज दोन हजार लिटर डिझेलची बचत

रेल्वेचे भाडे २० रुपये तर एसटीचे तब्बल ७०

चाळीसगाव-धुळे रेल्वेचे प्रवासी भाडे फक्त १५ रूपये असून एसटीचे भाडे ८० रूपयांपर्यत आहे. एसटीच्या तुलनेत अत्यंत कमी प्रवासी भाडे असल्याने प्रवाशांना धुळे पॅसेंजरने प्रवास करणे परवडते. त्यामुळे मोठ्या संख्येने प्रवासी धुळे पॅसेंजरने प्रवास करतात.

प्रवास मार्गावर भोरस, शिरूडसह एकूण ७ थांबे

चाळीसगाव, भोरस, जामदा, राजमाने, मोरदड तांडा, शिरूड, बोरविहिर, मोहाड धुळे हे ९ स्टेशन व ७ थांबे या रेल्वे मार्ग आहेत. प्रत्येक स्टेशनवर दोन मिनिटे गाड थांबते. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी धुळे ते चाळीसगाव पॅसेंजर अत्यंत सोयी आहे.

अनेक विकासात्मक कामे

या मार्गावर वेळोवेळी रेल्वे प्रशासनाकडून विकासाम्क कामेही केली गेली. सुरूवातीला हा रेल्वे मार्ग एकेरी व नॅरोगेज होता. नंतर त्याचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्यात आले. रेल्वे थांब्यावर प्रवाशांना बसण्यासाठी सुविधा, अपंगासाठी पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा तयार करण्यात आल्या. याशिवाय रेल्वे लाईनवर १० ठिकाणी मानव विरहीत गेट आहेत. त्या ठिकाणी फाटक बसविण्यात आले. काही ठिकाणी गेटमनची सुविधा पुरविण्यात आली.

रोज तीन लाखांचे उत्पन्न; निम्मा खर्च डिझेलमध्येच

चाळीसगाव ते धुळे दुपारची फेरी १५ दिवस रद्द केल्याने दुपारी कालीपिली तसेच बसला धुळे जाण्यासाठी गर्दी होत आहे. चाळीसगाव ते धुळे रेल्वे पॅसेंजरला अप व डाऊन मार्गावर रेल्वे प्रशासनास रोजचे साधारण तीन लाखाचे उत्पन्न चार फेऱ्यांमधून आहे. त्यातील ७० टक्के खर्च हा फक्त डिझेलवर खर्च होत होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनास धुळे गाडी न परवडणारी आहे. मात्र मालवाहू गाड्यांमधून उत्पन्न भरून निघत असे. आता मात्र या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण होत असल्याने रेल्वेचा खर्च निम्मा कमी होईल. याशिवाय प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होईल.

२१ तारखेपर्यंत १ फेरी बंद

चाळीसगाव ते धुळे पॅसेंजरच्या रोजच्या ४ फेऱ्या होतात. स्लिपर बदलण्याच्या या कामासाठीच दि. ६ ते २१ दरम्यान अशा एकुण १६ दिवस दुपारची एक फेरी बंद करण्यात आली आहे. चाळीसगाव धुळे मार्गावर जामदा सेक्शन दरम्यान इंजीनिअरींग ब्लॉक घेण्यात आला आहे. त्यामुळे गाडी क्र. ५१११४ व ५१११५ धुळे चाळीसगाव व चाळीसगाव धुळे या दोन्ही पॅसेजर रद्द करण्यात आल्या आहे. प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्राासनातर्फे करण्यात आले आहे.

८ महिन्यात कामाचे उद्दिष्ट

चाळीसगाव ते धुळे रेल्वे मार्गाचे गेल्या काही दिवसांपासून विद्युतीकरणाचे काम सुरू आहे. हे काम येत्या ७ ते ८ महिन्यात पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. सध्यस्थितीत या मार्गावर धावणाऱ्या प्रवासी व माल गाडी डिझेल इंजिनवर धावतात. फक्त धुळे पॅसेंजरसाठी रोजचे दोन हजार लिटर लागते. तसेच यामार्गावर सिमेंट तसेच इतर मालाची वाहतुक करण्यासाठी मालगाड्या धावतात. रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण झाल्यामुळे रोजचे दोन हजार लिटरपेक्षा अधिक डिझेलची बचत होणार आहे.